ePaper

**“आम्ही खोलात गेलो तर अवघड जाईल, भाजपाचा सुप्रिया सुळेंना थेट इशारा**



| वर्ष - 7 | अंक - 144 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 1 ऑक्टोंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत


- टीम इंडियापुढे पाकिस्तानने टेकले गुडघे!
- अर्चना पुरणसिंह अन् बिग बी अफेअर ?
- मी प्रश्न विचारला की भाजप हादरते!
- शिंदे सरकार आदित्य ठाकरेंना घाबरले!


### खासदार श्रीरंग बारणे यांच्यासह

# चौघांची निर्दोष मुक्तता!

## » अनधिकृत बांधकाम विरोधी आंदोलन : 10 वर्षांचा न्यायालयीन लढा यशस्वी

**।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड शहरातील अनधिकृत बांधकामांवरील कारवाई विरोधातील आंदोलनाच्या गुन्ह्यातून मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांच्यासह भगवान वाल्हेकर, एकनाथ पवार, नामदेव ढाके यांची निर्दोष मुक्ततता झाली. खासदार बारणे यांच्या नेतृत्वात मोठे जनआंदोलन उभारले होते. वडगाव मावळ आणि पिंपरी न्यायालयात दहा वर्षे वा-या कराव्या लागत होत्या. दहा वर्षांनी महिन्याभरापूर्वी वडगाव आणि शुक्रवारी पिंपरी न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. दरम्यान, आंदोलनाच्या लढ्याला यश आले असून, शहरातील अवैध बांधकामांचा सरसकट शास्तीकर माफ झाला आहे.**



शहरातील अनधिकृत बांधकामांचा मुद्दा बारा वर्षांपूर्वी ऐरणीवर आला होता. महापालिका प्रशासनाने बांधकामांवर हातोडा मारण्यास सुरुवात केली होती. या कारवाईमुळे शहरातील नागरिक, उपजिवीका भागविण्यासाठी आलेल्या कष्टक-यांवर बेघर होण्याची वेळ आली होती. या सर्वांचा आवाज ठरण्याचे काम तत्कालीन नगरसेवक असलेल्या खासदार श्रीरंग बारणे यांनी केले. या कारवाईविरोधात मोठे जनआंदोलन उभारले.

तत्कालीन प्राधिकरण कार्यालयावर लाखोंचा मोर्चा काढला. कारवाई विरोधातील जनतेचा तीव्रता राज्य सरकारपर्यंत पोहोचविण्यासाठी निगडीतील भक्ती-शक्तीपासून जुन्या पुणे-मुंबई महामार्गावरुन मुंबईतील मंत्रालयावर, नागपूरला विधानभवनावर भव्य मोर्चा काढला. या मोर्चात हजारो नागरिक सहभागी झाले होते. महामार्ग रोखणे, गर्दी जमवणे, गर्दीचे नेतृत्व करणे, जमावबंदी आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी खासदार श्रीरंग बारणे यांच्यासह शिवसेनेचे तत्कालीन शहरप्रमुख भगवान वाल्हेकर, भाजपचे एकनाथ पवार, नामदेव ढाके यांच्यावर मावळ, पिंपरी पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाले.

### अवैध बांधकामांचा शास्तीकर माफ

» तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांची भेट घेतली. त्यांच्यापर्यंत नागरिकांच्या तीव्र भावना पोहचविल्या. बांधकामावरील कारवाई थांबविण्याची विनंती केली. वेळोवेळी वेग-वेगळ्या टप्प्यावर आंदोलन केले. परिणामी, बांधकांमवरील कारवाई थांबली. त्यामुळे जनतेने सुटकेचा श्वास सोडला. महायुतीचे सरकार आल्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत सकारात्मक भूमिका घेतली. प्रश्नाचे गांभीर्य पाहून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सरसकट शास्तीकर माफीचा निर्णय घेतला. याबाबाबत स्थानिक आमदारांनीही विधानसभेत बाजू लावून धरली. मुख्यमंत्री शिंदे यांच्याशी जवळचे संबंध असल्याने खासदार बारणे यांनी पाठपुरावा करुन शास्तीकराचा प्रश्न मार्गी लावला.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या रूग्णालयात होणार ‘पेस्ट कंट्रोल’

## » महापालिकेच्या आरोग्य विभागाने प्रसिद्ध केली निविदा

**। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड शहरात महापालिकेचे 8 मोठी रूग्णालये, 33 दवाखाने असून या रूग्णालय, दवाखान्यात व परिसरात डास, माशा, ढेंकून, झुरळ, उंदीर, घुशी इत्यादींचा वावर होऊ नये, यासाठी महापालिकेच्या वतीने वेळोवेळी औषध फवारणी अर्थात पेस्ट कंट्रोल केले जाते. शास्त्रोक्त पध्दतीने पेस्ट कंट्रोल करण्यासाठी महापालिकेच्या आरोग्य विभागाने निविदा प्रसिद्ध केली आहे.**



यासाठी 38 लाखांचा खर्च गृहीत धरण्यात आला असून तीन वर्षांसाठी हे काम ठेकेदाराला देण्यात येणार आहे. महापालिकेच्या वैद्यकीय विभागांतर्गत शहराच्या विविध भागांमध्ये 750 खाटांच्या क्षमतेचे सर्वात मोठे वायसीएम, 400 खाटांचे थेरगाव रूग्णालय, 100 खाटांचे नवीन भोसरी, 130 खाटांचे नवीन आकुर्डी रूग्णालय, 120 खाटांचे नवीन जिजामाता यासह 8 मोठी रूग्णालये असून 33 दवाखाने आहेत.

या रूग्णालये व दवाखान्यात बाह्य रूग्ण आणि अंतर रूग्ण विभागात उपचारासाठी दररोज शेकडो रूग्ण येत आहेत. त्यामुळे रूग्णालयाची व दवाखान्यांची स्वच्छता ठेवणे ही महापालिकेच्या वैद्यकीय विभागासह आरोग्य विभागाची आहे.

### 5 ऑक्टोबरपर्यंत निविदा मागविल्या

**» रूग्णालयात व परिसरात डास, माशा, ढेकूण, झुरळ, उंदीर, घुशी इत्यादींचा (PCMC) वावर होऊ नये, यासाठी शास्त्रोक्त पध्दतीने औषध फवारणी करणे गरजेचे असते. त्यामुळे या कामासाठी महापालिकेच्या आरोग्य विभागाने निविदा प्रसिध्द केली आहे. पात्र ठेकेदारांकडून 5 ऑक्टोबरपर्यंत निविदा मागविल्या आहेत. हे काम ठेकेदाराला तीन वर्षांसाठी देण्यात येणार आहे. एका वर्षांसाठी जीएसटीसह 12 लाख 74 हजार 424 रूपये प्रमाणे तीन वर्षांसाठी 38 लाख 23 हजार 272 रूपये खर्च गृहीत धरण्यात आला आहे.**

# दावोस दौऱ्यात 32 कोटींचा खर्च!

## एक लाख पाच हजार कोटींचे 11 उद्योग येणार : उद्योगमंत्री

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**दावोसमध्ये राज्य सरकारकडून जे गुंतवणूक करार करण्यात आले, त्यातील 77 टक्के करारांची अंमलबजावणी करण्यात आली आहे. जवळपास एक लाख पाच हजार 20 कोटी रुपयांच्या 11 उद्योगांना देकर पत्र दिले आहे. उर्वरित उद्योगांना पुढील एका महिन्यात प्रत्यक्ष उद्योग सुरू करण्यासाठी देकर पत्र देण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील सरकार प्रयत्नशील आहे.**

अशी माहिती राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी शनिवारी पत्रकार परिषदेत दिलीमंत्री उदय सामंत म्हणाले, दावोसमध्ये राज्य सरकारकडून अनेक गुंतवणूक करार करण्यात आले. मात्र, विरोधकांकडून सांगण्यात आले की, या दौऱ्यासाठी 40 कोटी खर्च आला. पण, तो प्रत्यक्षात 32 कोटी रुपये आहे. त्यातील सर्वात मोठा खर्च हा महाराष्ट्र पॅव्हेलियानला 16 कोटी 30 लाख रुपये आलेला असून ते चार हजार स्क्वेअर फूट मोठे होते. महाविकास आघाडी काळात या दौऱ्यास प्रसिद्धीसाठी दोन कोटी रुपये आंतरराष्ट्रीय स्तरावर खर्च करण्यात आले. पण यंदा चार दिवस परिषद होती आणि त्यावर तींन कोटी 42 लाख खर्च आला आहे. मंत्री उदय सामंत म्हणाले, आमच्या सरकारने एक कोटी 37 लाख रुपयांचे करार केले. यापूर्वीच्या सरकारने 80 हजार कोटींचे करार झाले आणि त्यापैकी केवळ 12 हजार कोटी करार प्रत्यक्षात आले. आम्ही एकूण कराराच्या 77 टक्के म्हणजेच



एक लाख पाच हजार 20 कोटी रुपयांच्या 11 उद्योगांना देकर पत्र दिलेले आहे. उर्वरित उद्योगांना पुढील एक महिन्यात प्रत्यक्ष उद्योग सुरू करण्यासाठीचे देकर पत्र देण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील आहे. मंत्री उदय सामंत म्हणाले, मुख्यमंत्री तसेच इतर मंत्र्यांच्या परदेश दौऱ्यावर काहीजण सातत्याने चुकीची टीका करून गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न करत आहे. एखाद्या गोष्टीचे राजकारण करावे मात्र टीका करताना भाषा चांगली असावी. सातत्याने चुकीच्या गोष्टी सांगून लोकांमध्ये संभ्रम निर्माण केला जाऊ नये. अन्यथा 25 वर्षाच्या कारकिर्दीत कोणाकोणाचा खर्च कोणी केला, कोणी सबसिडीचे फायदे घेतले, याबाबी आम्हालाही मांडावे लागते. मंत्री उदय सामंत म्हणाले, परदेशी गुंतवणूकीत महाराष्ट्र राज्य प्रथम क्रमांकावर असून तब्बल 36 हजार कोटींची परदेशी गुंतवणूक महाराष्ट्रात झालेली आहे. मंत्री सुधीर मुनगंटीवार हे लंडन दौऱ्यावर छत्रपती शिवाजी महाराजांची वाघ नखे परत मिळावी याबाबतचा करार करण्यासाठी जाणार आहे. या कार्यक्रमास मी देखील उपस्थित राहणार आहे. त्यासोबत एमआयडीसीचे दोन करार त्याठिकाणी होणार आहे. त्याचसोबत दावोस येथे महाराष्ट्र पॅव्हेलियनची तयारी कशाप्रकारे सुरू आहे. याबाबतची पाहणी देखील मी करणार आहे. माझ्या परदेश दौऱ्याच्या बाबतीत नेमका खर्च कोणी केला याबाबतची माहिती विरोधकांनी मी परदेश दौऱ्यावरून आल्यावर घ्यावी. मुंबईतील रस्त्यावर दरवर्षी डांबर ओतून पुढील वर्षी कसे खड्डे पडतील हे उद्योग कोण करत होते? हे तपासावे लागेल. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईतील रस्ते कॉंक्रिटीकरण केल्याने खड्डे मुक्त रस्ते दिसत आहे.

### ठाकरे गटाला इशारा

» मंत्री उदय सामंत म्हणाले, मुख्यमंत्री तसेच इतर मंत्र्यांच्या परदेश दौऱ्यावर काहीजण सातत्याने चुकीची टीका करून गैरसमज पसरवण्याचा प्रयत्न करत आहे. एखाद्या गोष्टीचे राजकारण करावे मात्र टीका करताना भाषा चांगली असावी. सातत्याने चुकीच्या गोष्टी सांगून लोकांमध्ये संभ्रम निर्माण केला जाऊ नये. अन्यथा 25 वर्षाच्या कारकिर्दीत कोणाकोणाचा खर्च कोणी केला, कोणी सबसिडीचे फायदे घेतले, याबाबी आम्हालाही मांडावे लागते. मंत्री उदय सामंत म्हणाले, आमच्या सरकारने एक कोटी 37 लाख रुपयांचे करार केले. यापूर्वीच्या सरकारने 80 हजार कोटींचे करार झाले आणि त्यापैकी केवळ 12 हजार कोटी करार प्रत्यक्षात आले. आम्ही एकूण कराराच्या 77 टक्के म्हणजेच एक लाख पाच हजार 20 कोटी रुपयांच्या 11 उद्योगांना देकर पत्र दिलेले आहे.

# देशाला महात्मा गांधी यांचे विचारच वाचवू शकतात!

## मोदी सरकारकडून सत्याचे विचार दाबण्याचे काम: सबनीस

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सध्या देशभरात विचारांचे विद्रुपीकरण करण्याचे काम सुरु आहे. सत्याचे विचार दाबण्याचे काम मोदी सरकारकडून सुरु आहे. पंतप्रधान मोदी आपला चेहरा देशभरात व्यापण्यासाठी प्रयत्न करीत आहे. त्यांचा हा प्रयत्न कधीही यशस्वी होणार नाही. महात्मा गांधींनी शेवटच्या घटकापर्यंत विकास होण्यासाठी प्रयत्न केला.**



महात्मा हेच खरे देशाचे नायक असून त्यांचे विचाराच देशाला वाचवू शकतात, असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांनी केले. पुणे शहर जिल्हा कॉँग्रेस कमिटी आयोजित महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्त महात्मा गांधी यांच्या जीववनार आधारित सुमारे 100 दूर्मीळ छायाचित्रांचे प्रदर्शन बाळासाहेब ठाकरे कलादालनात भरविण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उदघाटन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष व ज्येष्ठ साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी महाराष्ट्र प्रदेश कमिटीचे सरचिटणीस ॲड. अभय छाजेड, कॉँग्रेसचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे, माजी मंत्री रमेश बागवे, माजी नगरसेवक दत्ता बहिरट, लता राजगुरु, कमल व्यवहारे, सर्व ब्लॉक अध्यक्षासह आदी कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते. डॉ. सबनीस म्हणाले, सध्या अनेकांच्या डोळ्यावर झापडे आली आहेत. अनेकांची निष्ठा पातळ झालेली आहे. त्या निष्ठा जागेवर याव्यात, गांधीप्रेम, लोकशाही जपण्यासाठी या उद्देशाने गांधींचे विचार पोहचविण्यासाठी सातत्याने गांधीवरील जीवन कार्याचे काम पुढे न्यावे लागेल. जगाला प्रेरीत करणारे गांधी एका देशाचे नसून ते जगभराचे नायक आहे. स्वातंत्र्याबरोबरच त्यांनी विश्वशांतीचादेखील संदेश दिला आहे. विश्वाच्या कल्याणाचा ध्यास त्यांच्या विचारात होता. हाच विचार आपल्याला तारु शकतो. महात्मा गांधीचा लढा श्रमाला ताकद देणारा होता. त्यांनी देशाच्या कल्याणासाठी वस्त्र सोडून पंचा नेसला. महात्मा गांधी सत्याग्रहाने लढले. मात्र आज त्यांच्या विचारा गोळ्या घालण्याचे काम सुरु आहे. काहीजण त्यांच्या स्मृतीस्थळाला गोळ्या घालत आहे. त्यांचे विचार हे लोक कधीही संपवू शकत नाही. पंतप्रधान मोदी त्यांचेच विचाराने पुढे जात आहे. मात्र ते वेगळ्या पद्धतीने सांगत आहे. जगात फिरताना महात्मा गांधीचेच नाव त्यांना घ्यावे लागते. मात्र देशात गांधीचे नाव दाबण्याचे काम त्यांच्या हातून होत असल्याची खंत यावेळी सबनिस यांनी व्यक्त केली. महात्मा गांधी यांचे योगदान देश कधीही विसणार नाही. अखंड भारतासाठी गांधीचा हा मुळ ध्येयवाद होता. गांधीचा इतिहास कोणीही वाचला नाही. त्यांचे विचार, साहित्य वाचावे, असेही यावेळी डॉ. सबनिस यांनी सांगितले.

### महात्मा गांधी जगभराचे नायक

» डॉ. सबनीस म्हणाले, सध्या अनेकांच्या डोळ्यावर झापडे आली आहेत. अनेकांची निष्ठा पातळ झालेली आहे. त्या निष्ठा जागेवर याव्यात, गांधीप्रेम, लोकशाही जपण्यासाठी या उद्देशाने गांधींचे विचार पोहचविण्यासाठी सातत्याने गांधीवरील जीवन कार्याचे काम पुढे न्यावे लागेल. जगाला प्रेरीत करणारे गांधी एका देशाचे नसून ते जगभराचे नायक आहे. स्वातंत्र्याबरोबरच त्यांनी विश्वशांतीचादेखील संदेश दिला आहे. विश्वाच्या कल्याणाचा ध्यास त्यांच्या विचारात होता. हाच विचार आपल्याला तारु शकतो.

# देहू-आळंदी रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य!

## वाहतूक कोंडीत भर, नागरिकांमधून संताप

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**विविध बांधकामे, रस्त्यांची खोदाई, प्रशासनाचे दुर्लक्ष यामुळे देहू-आळंदी मार्गावरील रस्त्याची चाळण झाली आहे. रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत. खड्ड्यातून वाहनांना सावकाश वाट काढावी लागत आहे. परिणामी या रस्त्यावर वाहतूक कोंडी होत आहे. नागरिकांमधूनही तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.**

आळंदी देहू जोडणारा रस्ता आळंदी कडून डुडूळगाव फाटा ते सावता माळी मंदिरा पर्यंत जाणाऱ्या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डयांचे साम्राज्य आहे. अनेक वेळेला या रस्त्यावर रस्त्याची खोदाई केली जाते. पाईपलाईन टाकणे, केबल टाकणे यामुळे रस्त्याची खोदाई होत आहे. ही रस्ते खोदाई करून विकास कामे केल्यानंतर तात्काळ पूर्ववत रस्ता विकिसित करणे गरजेचे आहे. मात्र महापालिका आणि संबंधीत ठेकेदार याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे. रस्त्यावरील खड्डयांनी अपघाताची शक्यता असल्याने तात्काळ खड्डे भरण्याची मागणी येथील नागरिक करीत आहेत. काही ठिकाणी इंद्रायणी कडे जाणाऱ्या वाय जंक्शन रस्त्यावर चेंबरला असलेली झाकणे तुटलेली असतात. परिणामी रात्रीच्या वेळी वाहने चालविताना वाहनधारकांना कसरत करावी लागत आहे. हे रस्ते सुरळीत होणार कधी, असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

### अपघाताची शक्यता वाढल्या

» श्री संत तुकोबा महाराज, श्री संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या दर्शनासाठी राज्यभरातून वारकरी दाखल होतात. या रस्त्यावर वाहतूकीची रहदारी सातत्याने होत असते. त्यामुळे मोठे खड्डे पडत आहेत. ते दुरूस्त न केल्याने वाहनधारकांची वाहने त्यामध्ये आदळत आहेत. पावसाळ्यात पाणी साचत आहे. परिणामी वाहनधारकांना याचा अंदाज येत नाही. त्यामुळे वाहनांचे अपघात होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

### नोकरदारांना मानसिक त्रास

» सकाळी दहा वाजता तर सायंकाळी पाच नंतर या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूकीची कोंडी होते. त्यामुळे कामावर जाण्यासाठी आणि कामावरून परत घरी येणाऱ्या नोकरदारांसाठी हा प्रवास जिकिरीचा होत आहे. सातत्याने होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे कामावर वेळेत पोचता येत नाही. परिणामी मानसिक आणि शारिरिक त्रासाला नोकरदारांना सामोरे जावे लागत आहे.



# पिंपरी-चिंचवडचा पाणीपुरवठा येत्या गुरुवारी बंद!

## निगडीतील जलशुद्धीकरण केंद्रातील देखभाल दुरुस्तीचे कामकाज

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**निगडीतील जलशुद्धीकरण केंद्रातील देखभाल दुरुस्तीच्या कामासाठी ५ ऑक्टोबर रोजी पाणीपुरवठ्याची यंत्रणा बंद ठेवण्यात येणार आहे. गुरुवारी सकाळचा पाणीपुरवठा केल्यानंतर दुरुस्तीच्या कामामुळे सायंकाळाचा पाणीपुरवठा होणार नाही. तर, शुक्रवारी ६ ऑक्टोबर रोजी सकाळचा पाणीपुरवठा विस्कळीत राहणार असल्याची माहिती सह शहर अभियंता श्रीकांत सवणे यांनी दिली.**



मावळातील पवना धरणातून पिंपरी-चिंचवकरांना पाणीपुरवठा केला जातो. रावेत येथील बंधा-यातून अशुद्ध जलउपसा करण्यात येतो. सेक्टर २३ निगडी येथे पाणी शुद्ध करुन शहरवासीयांना पुरवठा केला जातो. जलशुद्धीकरण केंद्रातील पाणीपुरवठा विषयक नियमित देखभाल दुरुस्ती, पाणी वितरण व्यवस्थेतील विविध ठिकाणी देखभाल दुरुस्तीची कामे करण्यात येणार आहेत. त्यासाठी गुरुवारशहरातील पाणीपुरवठ्याची यंत्रणा बंद ठेवण्यात येणार आहे.

गुरुवारी सकाळचा पाणीपुरवठा केला जाईल. परंतु, त्यानंतर दुरुस्तीच्या कामामुळे शहरातील सर्व भागांचा सायंकाळाचा पाणीपुरवठा होणार नाही.

दुरुस्तीच्या कामासाठी पाणीपुरवठ्याची सर्व यंत्रणा बंद ठेवल्यामुळे शहरातील सर्व भागात दुस-या दिवशी म्हणजेच शुक्रवारी सकाळचा पाणीपुरवठा विस्कळीत राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने केले आहे.

# पाचशे रुपये दिले आणि पाच लाख काढून घेतले! नवी सांगवीतील घटना

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।




ऑनलाइन तिकीट बुक करण्याच्या पार्टटाइम कामाचे महिलेला ५०० रुपये दिले. पुढे काही रक्कम देऊन महिलेचा विश्वास संपादन करून अधिक रक्कम गुंतवल्यास चांगले कमिशन मिळेल. तसेच डिपॉझिट म्हणून काही पैसे भरण्यास सांगून तब्बल चार लाख ७९ हजार ४५२ रुपयांची फसवणूक केली. ही घटना २९ ऑगस्ट ते ११ सप्टेंबर २०२३ या कालावधीत नवी सांगवी येथे घडली. या प्रकरणी पीडित महिलेने सांगवी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार पोलिसांनी संशयित यशिका शर्मा तसेच एका कंपनीवर गुन्हा दाखल केला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संशयित यशिका हिने फिर्यादी यांना ऑनलाइन पद्धतीने संपर्क साधला. स्काय स्कॅनर या कंपनीमध्ये ऑनलाइन तिकीट बुक करण्याचा पार्ट टाइम जॉब असल्याचे सांगून एक लिंक पाठवली. या लिंकद्वारे फिर्यादी महिलेने खाते उघडले. कामाच्या बदल्यात महिलेला प्रथम ५०० रुपये, नंतर सहा हजार ७०० आणि २४ हजार रुपये कमिशन म्हणून दिले. जास्त पैसे मिळवण्यासाठी महिलेला अमिष दाखवून चार वेळा पैसे डिपॉझिट करण्यास सांगून महिलेकडून चार लाख ७९ हजार ४५२ रुपये ऑनलाइन पद्धतीने घेतले.

# उसन्या उत्साहाची ‘नकोशी’ स्पर्धा!



## भूमिका

**जगातील बहुतेक प्रमुख खेळांमध्ये- ज्यांना मोठा रसिकाधार आणि अखंड उत्पन्नस्रोत आहे- सांघिक विश्वचषक स्पर्धा म्हटली, की टप्प्याटप्प्याने सहभागी संघांची संख्या वाढवण्याकडे कल दिसून येतो. फुटबॉलचे खणखणीत उदाहरण सर्वासमोर आहेच. १९८२पासून (२४) पुढील २०२६ विश्वचषकापर्यंतच्या (४८) ४४ वर्षांत सहभागी संघांच्या संख्येत दुपटीने वाढ झाली.**

इतरही खेळांची उदाहरणे देता येतील. अपवाद क्रिकेटचा! १९७५मध्ये पहिल्यावहिल्या क्रिकेट विश्वचषकात आठ संघांचा सहभाग होता. सुरुवातीच्या काही स्पर्धामध्ये आठच संघ सहभागी झाले. हा आकडा पुढे १०, १२, १४, १६ असा वाढत गेला. परंतु २०१९मधील स्पर्धेपासून ही संख्या पुन्हा १० वर आली. यंदाही भारतातील स्पर्धेत १० संघच खेळतील. यावेळी माजी विजेते वेस्ट इंडिज, तसेच झिम्बाब्वे, आर्यलड हे संघ दिसणार नाहीत. ते पात्रता फेऱ्यांमध्ये पराभूत झाले. एका अर्थी हा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील चुरस वाढल्याचा पुरावा मानला जाऊ शकतो.



पण यंदा नेदरलँड्स वगळता सर्वच संघ हे कसोटी दर्जा मिळालेले म्हणजेच प्रस्थापित संघ आहे. शिवाय चुरस वाढू लागल्याचा पुरावा ठरलेले अनेक संघ एव्हाना विस्मृतीत गेले, त्याचे काय? चुरस वाढल्याने एकदिवसीय क्रिकेटचा पसारा काही वाढला नाही. उलट २०१९ आणि २०२३ अशा दोन विश्वचषकांमध्ये तो आक्रसतानाच दिसतो आहे. झिम्बाब्वे, केनिया, आर्यलड, बांगलादेश अशा काही धक्कादायी संघांपैकी केवळ बांगलादेशच एकदिवसीय विश्वचषक स्पर्धामध्ये स्थिरावला. बाकीचे परिघावर किंवा परिघाबाहेरच राहिले. तेव्हा दोन वेळच्या माजी विजेत्या वेस्ट इंडिजची अनुपस्थिती ही ‘गुणात्मक वाढ’ नसून ‘संख्यात्मक’ घट ठरते. सन २०२७मधील विश्वचषक स्पर्धा दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि नामिबिया या देशांमध्ये होत आहे. नामिबिया यापूर्वी २००३मध्ये दक्षिण आफ्रिका, झिम्बाब्वे आणि केनियामध्ये झालेल्या विश्वचषकात सहभागी झाला होता. त्यानंतर लुप्त झाला. पुढील विश्वचषकाच्या निमित्ताने तो पुन्हा प्रकट होईल. पण हे प्रकटणे सहयजमान म्हणून असेल. इतक्या काळात नामिबियातील क्रिकेट विकासाच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद अर्थात आयसीसीने कोणती पावले उचलली, केनियासारख्या झुंजार संघाला क्रिकेटच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी काय प्रयत्न केले, हे आता विचारण्याची सोय नाही. तथाकथित दुबळ्या संघांचे सामने म्हणजे प्रेक्षकवर्ग नाही आणि टीव्ही तसेच डिजिटल प्रसारणादरम्यान जाहिरातींमधून उत्पन्न नाही, असे क्रिकेट प्रशासनातली कॉर्पोरेट मंडळी अलीकडे वारंवार सांगत असतात. असाच ‘दुबळा’ संघ एके काळी भारताचा होता. कोणे एके काळी अशाच दोन ‘दुबळ्या’ संघांतील सामन्याचे थेट प्रक्षेपण करण्याचीदेखील तसदी त्यावेळच्या संयोजकांनी घेतली नव्हती. त्या सामन्यात काही विक्रम मोडीत निघाले आणि नवीन विश्वविजेता होण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊलही टाकले गेले. भारत वि. झिम्बाब्वे सामन्याची पूर्ण व अधिकृत चलचित्रफीत निव्वळ संयोजकांच्या बेफिकिरीमुळे आणि अज्ञानामुळे जगासमोर येऊ शकली नाही. भारताने स्वयंप्रेरणेने आणि स्वबळावर क्रिकेटमध्ये स्वत:चे अस्तित्व आणि दरारा निर्माण केला. परंतु व्यवस्थेचे असे दुर्लक्ष झुगारून उभे राहण्याची क्षमता प्रत्येक संघात नसते. हेच थोडय़ाफार प्रमाणात श्रीलंकेनेही करून दाखवले. १९९२मध्ये त्यांचा भारताविरुद्धचा सामना अत्यंत दुय्यम मैदानावर खेळवला गेला, तो पावसामुळे धुवून निघाला. श्रीलंकेने पुढील स्पर्धेत विश्वचषक जिंकून दाखवलाच. बांगलादेश हा इतर ‘दुबळय़ां’च्या तुलनेत अधिक नशीबवान ठरला. बांगलादेशचा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये प्रवेश तत्कालीन आयसीसी अध्यक्ष जगमोहन दालमिया यांच्या वरदहस्तामुळे सुकर झाला. पण हा अपवाद. शिवाय बांगलादेश आज एक बऱ्यापैकी गुणवान संघ म्हणून ओळखला जातो. आयसीसी एकदिवसीय विश्वचषक स्पर्धा ही आजही क्रिकेटमधील महत्त्वाची स्पर्धा मानली जाते. पण या स्पर्धेच्या भवितव्याविषयीच प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. तेव्हा इंग्लंड आणि भारत या प्रमुख देशांमध्ये आधुनिक काळात झालेल्या व होत असलेल्या विश्वचषकांमध्ये संघांची संख्या आक्रसते आहे, हा निव्वळ योगायोग नाही. अलीकडे आयसीसीमार्फत टी-२० विश्वचषक स्पर्धाही वरचेवर भरवली जाते. शिवाय एकदिवसीय आणि टी-२० या दोन्ही प्रकारांमध्ये महिला विश्वचषक स्पर्धाही खेळवल्या जातात.

## संपादकीय »

### सदा-हरित!

***हरितक्रांतीच्या मर्यादाही ओळखून स्वामिनाथन यांनी पर्यावरणनिष्ठ संकल्पना मांडल्या, शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचा विचार केला, हे शास्त्रज्ञ असण्याच्या पलीकडले त्यांचे मोठेपण..***

वाढत्या लोकसंख्येमुळे वाढणारी भूक शमवण्यासाठी भारताच्या शेतीविषयक धोरणांत फार मोठा बदल घडणे, एवढा एकच पर्याय जेव्हा होता, त्या सत्तरच्या दशकात या बदलाचे नेतृत्व डॉ. एम. एस. स्वामिनाथन यांनी केले. अमेरिकेच्या पीएल ४८० योजनेतून भारताला त्या काळात मिळालेले मिलो हे धान्य ज्यांनी खाल्ले असेल, त्यांना डॉ. स्वामिनाथन यांच्या या अथक प्रयत्नांचे महत्त्व अधिक कळू शकेल. तल्लख बुद्धिमत्ता, राष्ट्रप्रेमाने ओतप्रोत भरलेले मन आणि त्याच्या जोडीला संशोधनातून नवे काही मिळवण्यासाठीची धडपड यामुळे त्यांना या दुष्काळावरील एक उपाय सापडला. त्या उपायाची चळवळ घडवून आणण्यासाठी त्यांच्याकडे जे नेतृत्वगुण होते आणि पटवून देण्याचे कौशल्य होते, त्यामुळे त्यानंतरच्या काळात अन्नधान्याबाबत भारत स्वयंपूर्ण होण्यासाठी झटू लागला.

**नुकतीच ‘बुकर’ पारितोषिकासाठी सहा पुस्तकांची लघुयादी जाहीर झाली, तशी कॅनडामध्येही दर वर्षी, सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात ‘गिलर’ पारितोषिकाची १२ कादंबऱ्यांची दीर्घ यादी घोषित होते. या ‘गिलर’च्या यंदाच्या यादीत मनेका रामन विल्म्स या भारतीय वंशाच्या लेखिकेची ‘रूफटॉप गार्डन’ ही कादंबरी नामांकित आहे. ‘ग्लोब अ‍ॅण्ड मेल’मध्ये पत्रकारिता करणाऱ्या मनेका आधी ‘ओटावा बुक्स ऑफ रिव्ह्यू’मध्ये पुस्तकांवर लिहीत.**

# बुकरायण : वाचणाऱ्यांचे ‘बुकर’वर्ष..

‘सीबीसी’ या तेथील राष्ट्रीय वाहिनीच्या कथास्पर्धेत त्यांची कथा गाजली. याशिवाय कॅनडातील कथाकारांचे परमोच्च दैवत असलेल्या अ‍ॅलिस मन्रो यांच्या नावे चालणाऱ्या वार्षिक महोत्सवात मनेका रामन विल्म्स ही युवा पुरस्कार पटकावणारी लेखिका म्हणून चर्चेत होती. तिच्या पहिल्याच कादंबरीला ‘गिलर’ पुरस्कारासाठी नामांकन मिळाले आहे. गिलर पुरस्काराच्या स्पर्धेत यंदा बुकरच्या लघुयादीत असलेले सारा बर्नस्टाईन यांचे ‘स्टडी फॉर ओबीडियन्स’ हे पुस्तक देखील आहे. (या बर्नस्टाईन यांचे मूळ कॅनडा असल्यामुळे. त्या राहतात स्कॉटलंडमध्ये आणि तिथे विद्यापीठांत साहित्य शिकविणे हा त्यांचा पेशा.) शिवाय मागे गलेलठ्ठ पुस्तक लिहून बुकर मिळविणाऱ्या एलेनॉर कॅटन यांची ‘बिरनाम वुड’ ही कादंबरी देखील आहे. (कॅटन यांचा मायदेश न्यूझीलंड. मात्र सध्याचे वास्तव्य कॅनडा.) गिलरच्या यादीत इरूम शाजिया हसन हे आणखी



एक भारतीय वाटणारे नावही आहे. (पण त्या पाकिस्तानी-कॅनडाजन्मी आहेत) कॅनडाच्या बुकर’चा तपशील यासाठी दिला, कारण जवळपास ब्रिटनमधल्या बुकर पुरस्कार काळात इतर जगासाठी ही यादी झाकोळली जाते. पण तरी याद्यांतील स्थानाने पुस्तकविक्रीला मोठा हातभार लागतो. बुजुर्ग असो वा नवथर, तिथल्या वाचकांमध्ये नव्या लेखकांना आणि त्यांच्या विचारांना जाणून घेण्याची किती उत्सुकता आहे, हे अशा प्रकारच्या वार्षिक या पुरस्कार सोहळय़ाची धामधूम सुरू झाली की कळू लागते. कॅनडासारखाच ‘आफ्रिकेचा बुकर’ म्हणून ओळखला जाणारा- पण फक्त कथांसाठीचा- ‘केन’ पुरस्कारही या कालावधीतच साजरा होतो. शेकडो कथांमधून निवडल्या गेलेल्या पाच ते सहा कथा या खंडातील विविध देशांतून आलेल्या असतात. यंदा नायजेरियाच्या दोन आणि बोटस्वाना, सेनेगल, युगांडा या देशांतील एकेक कथा पुरस्काराच्या स्पर्धेत आहेत. या लेखकांच्या एकेक कथा म्हणजे आपापल्या देशातील भौगोलिक-सामाजिक आणि सांस्कृतिक घटकांना चित्रबद्ध करणाऱ्या कादंबऱ्या आहेत. या पुरस्कार स्पर्धामधील विजेते आणि उपविजेतेही तारांकित व्यक्तींसारखे आपले लेखकपण मिरवत राहतात, हे त्यांचे वैशिष्टय़. यंदा बुकरची दीर्घ यादी घोषित झाली, तेव्हा एक गमतीशीर बाब दिसली. इकडे भारतीय वाचकगणांना चेतना मारू या भारतीय वंशाच्या लेखिका आणि त्यांची ‘वेस्टर्न लेन’ ही कादंबरी (जणू काही आपल्या देशाचीच प्रतिनिधी) असल्यासारखी वाटली. मुंबईतील प्रसिद्ध आंग्लग्रंथ दुकानांत गेल्या शनिवारी या पुस्तकाच्या विक्रीसाठी आलेल्या सर्व प्रती संपल्या होत्या.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# शिंदे सरकार आदित्य ठाकरेंना घाबरले!

## 'यह डर अच्छा लगा' दौरे म्हणजे सुट्ट्या समजायला लागले : आदित्य

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**उद्धव ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी राज्यातील एकनाथ शिंदे- देवेंद्र फडणवीस सरकारवर पुन्हा एकदा हल्लाबोल केला आहे. आम्ही आरोप केल्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्या दोन मंत्र्यांचे दौरे रद्द करण्यात आले असल्याचा दावा देखील आदित्य ठाकरे यांनी केला आहे. या संदर्भात राज्य सरकारमधील 'यह डर अच्छा लगा' असे म्हणत आदित्य ठाकरे यांनी शिंदे सरकारला डिचवले आहे.**

शिवसेना ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारवर जोरदार हल्ला केला. मुख्यमंत्री आणि त्यांचे मंत्री जनतेच्या पैशावर परदेश दौरे करत आहेत. पण तिथे जाऊन ते नेमके करणार काय आहेत? कोणाला भेटणार आहेत? कोणत्या कंपन्यांना भेट देणार आहे? याची माहितीच नाही. त्यामुळे हे दौरे म्हणजे सुट्ट्या समजायला लागले आहेत का? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. आमच्या टीकेनंतर मुख्यमंत्र्यांनी दौरा रद्द केला असल्याचा दावा देखील आदित्य ठाकरे यांनी केला आहे. राज्यात घटनाबाह्य सरकार काम करत आहे. या सरकारचा 6 हजार कोटींचा रस्ते घोटाळा लोकायुक्तांकडे नेणार असल्याची माहिती देखील आदित्य ठाकरे यांनी माध्यमांशी बोलताना दिली. आदित्य म्हणाले की, स्ट्रीट फर्निचर घोटाळासुद्धा आम्ही



लोकायुक्तांकडे नेणार आहोत. मुख्यमंत्री फक्त टेंडर शोधत असतात. या सरकारमध्ये अनेकांना फॉरेन ट्रिप करायला आवडते. मात्र, याला हे सुट्टी समजायला लागेल आहेत. या दौऱ्यातून निघते काय? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला. मुख्यमंत्री यांचा दौरा जर्मनी, लंडनला निघाला होता. जर्मनीला हाय वे बघायला जाणार होते. मी प्रश्न विचारला की तुम्ही येथे जाऊन करणार काय? डाओसमध्ये आम्ही काय केले ते सगळे समोर आणले होते. मुख्यमंत्री नेमकं परदेशात जाऊन करणार काय? आम्ही असा प्रश्न विचारला होता. त्याच्या 30 मिनिटानंतर मुख्यमंत्र्यांनी त्यांचा दौरा रद्द केला, असा दावा देखील आदित्य ठाकरे यांनी केला आहे. राज्यातील सत्ता संघर्षानंतर आमदार अपात्रतेची महत्वाची सुनावणी सुरु असताना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर घाणा देशाच्या दौऱ्यावर जाणार होते. मात्र, त्यांचा दौरा देखील रद्द झाला असल्याची माहिती समोर आली आहे. एकीकडे आमदार अपात्रताप्रकरण रखडवून तुम्ही संसदीय लोकशाहीची हत्या करताय. आणि दुसरीकडे लोकशाहीसाठी दौरे करतात, असा आरोप ठाकरे गटाने केला होता. त्यानंतर त्यांनाही हा दौरा रद्द करावा लागला असल्याचा दावा आदित्य ठाकरे यांनी केला आहे. व्हिक्टोरिया अल्बर्ट म्युझियम वेबसाईटवर वाघ नखांबद्दल माहिती देण्यात आली आहे. त्यात असे म्हटलेय की, वाघ नखे शिवाजी महाराज यांनी वापरली की नाही? ही वाघ नखे शिवकालीन आहेत की शिवाजी महाराजांची आहेत? हे स्पष्ट करण्याची मागणी देखील आदित्य ठाकरे यांनी केली आहे. उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या परदेश दौऱ्यावर देखील त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. पाहणी दौरेच काढायचे असल्यास खारघरमध्ये जी दुर्घटना घडली, तिकडे का जात नाहीत, असा घणाघाती प्रश्न आदित्य ठाकरे यांनी उपस्थित केला आहे.

### राहुल नार्वेकर यांचाही दौरा रद्द

» राज्यातील सत्ता संघर्षानंतर आमदार अपात्रतेची महत्त्वाची सुनावणी सुरु असताना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर घाणा देशाच्या दौऱ्यावर जाणार होते. मात्र, त्यांचा दौरा देखील रद्द झाला असल्याची माहिती समोर आली आहे. एकीकडे आमदार अपात्रताप्रकरण रखडवून तुम्ही संसदीय लोकशाहीची हत्या करताय. आणि दुसरीकडे लोकशाहीसाठी दौरे करतात, असा आरोप ठाकरे गटाने केला होता. त्यानंतर त्यांनाही हा दौरा रद्द करावा लागला असल्याचा दावा आदित्य ठाकरे यांनी केला आहे.

# जरांगे पाटलांच्या दौऱ्याला सुरुवात!

## ठिकठिकाणी मराठा समाजाकडून स्वागत

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**सरकार सरकारचे काम करत आहे. आम्ही आमचे काम करत असून मराठा समाजातील लोकांचे आशिर्वाद घेण्यासाठी जात असल्याचे मत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केले आहे. मराठा समाजाचे उपोषण सोडताना राज्य सरकारने 30 दिवसांची मुदत मागितली आहे. तो पर्यंत आपण मराठा समाजातील नागरिकांची भेट घेण्यासाठी जात असल्याचे मनोज जरांगे यांनी सांगितले. या दौऱ्यात ठिकठिकाणी मनोज जरांगे पाटील यांचे स्वागत होत असून, त्यांच्यावर पुष्पवर्षाव होताना दिसत आहे.**

या बैठकीला आंदोलकांना बोलवण्यात आले नाही. यावर प्रश्न विचारला असता, ते आमचे काम नसल्याचे मनोज जरांगे यांनी सांगितले. सरकार सरकारचे काम काम करत आहे. आम्हाला दिलेल्या मुदतीत राज्यातील मराठा समाजाला कुणबी जातीचे प्रमाणपत्र हवे आहे.



### बैठकीला सरकारने आम्हाला बोलवावे

» सरकार सरकारचे काम काम करत आहे. आम्हाला दिलेल्या मुदतीत राज्यातील मराठा समाजाला कुणबी जातीचे प्रमाणपत्र हवे आहे. ते कसे द्यायचे हे सरकारचे काम आहे. बैठकीला सरकारने आम्हाला बोलवावे, ही आमची अपेक्षाच नाही. किंवा त्या बद्दल नाराजी नसल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी सांगितले. या बैठकीला आंदोलकांना बोलवण्यात आले नाही.

ते कसे द्यायचे हे सरकारचे काम आहे. मराठा समाजाला कुणबी जातीचे प्रमाणपत्र तसेच आरक्षण मिळण्यासाठी लढा देत असलेले मनोज जरांगे पाटील आजपासून मराठा समाजाला भेटण्यासाठी दौरा करत आहेत. आजपासून 11 ऑक्टोबरपर्यंत मनोज जरांगे पाटील हे 12 दिवसांच्या पहिल्या टप्प्यात 11 जिल्ह्यांतील 87 गावांमध्ये जाऊन मराठा समाजाशी संवाद साधतील.

त्यांचा एकूण 5 हजार किलोमीटरचा हा प्रवास असणार आहे. यावेळी त्यांच्यासोबत कायम 200 कार्यकर्ते आणि 25 वाहनांचा ताफा असेल. सरकारने मागितलेली वेळ 14 ऑक्टोबर रोजी संपणार आहे. या दिवशी आंतरवाली येथे 100 एकरांवर भव्य मेळावा घेतला जाईल. त्यासाठी आजपासून 11 ऑक्टोबरपर्यंत हा दौरा होणार आहे. जालना, हिंगोली, नांदेड, यवतमाळ, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, अहमदनगर या 10 जिल्ह्यांत हा पहिला टप्पा होणार आहे. 14 ते 23 ऑक्टोबर या दरम्यान दुसरा टप्पा होईल. 24 ऑक्टोबर ही आरक्षण देण्याची अंतिम मुदत असून त्यानंतर भूमिका ठरवू, असे जरांगे पाटील यांनी सांगितले आहे.

# आघाडीतील दोन नेत्यांमध्ये जुंपली!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वड्डेटीवार यांनी ओबीसी बनावट प्रमाणपत्राचे केलेले आरोप खोटे असुन असे कोणतेही प्रमाणपत्र माझ्याकडे नसल्याचे स्पष्टीकरण विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी दिले आहे. वड्डेटीवार यांनी माध्यमांना माहिती दिली असेल तर त्याचे पुरावे सर्वासमोर सादर करावे, असे आवाहन दानवे यांनी केले आहे. विजय वडेट्टीवार यांनी व्यक्तिशः माझ्यावर केलेले आरोप पूर्णतः खोटे असून त्यांच्याकडे अशी काही माहिती असेल तर त्यांनी याचे पुरावे सादर करुन सत्य माहिती सर्वासमोर सादर करावी. तसेच विरोधी पक्षनेते यांनी सत्य माहिती घेऊन असे आरोप करावे, असा सल्ला सुद्धा त्यांनी यावेळी दिला. शिवसेनेचा एक कार्यकर्ता म्हणून मला अभिमान आहे. शिवसैनिक म्हणूनच मी राज्यभर फिरतो. मी कोणत्याही जातीचा नेता नसून आतापर्यंत कसल्याही आरक्षित जागेचा मी लाभ घेतलेला नाही. नगरसेवक ते विरोधी पक्षनेते पदापर्यंत पोहोचलो तरीही खुल्या गटातून मी निवडून आलेलो आहे, अशी या वादावर दानवे यांनी टिप्पणी केली. मराठा समाजाला आरक्षण देताना इतर समाजाचे नुकसान होईल असा निर्णय शासनाने घेऊ नये, यामुळे मराठा समाजासह इतर समाजाचे सुद्धा नुकसान होऊ शकते. शेतकरी समाजाचा उल्लेख अजूनही कुणबट म्हणून केला जातो, मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी हा पुरावा फायदेशीर ठरू शकतो, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. मराठवाड्यात गुपचूपपणे मराठ्यांना सरसकट ओबीसी प्रमाणपत्र वाटप करण्यात येत असल्याचा गंभीर आरोप विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

# मी प्रश्न विचारला की भाजप हादरते!

## » आरएसएस कायदे बनवतो, खासदारांना विचारतही नाही

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मध्य प्रदेशातील शाजापूरमध्ये काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी जात जनगणनेवरून केंद्र सरकार आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींना धारेवर धरले. ते म्हणाले, 'नरेंद्र मोदी ओबीसी सरकार चालवत नाहीत. ते दलित आणि आदिवासींसाठीही काम करत नाहीत. त्यांचे काम लक्ष विचलित करणे, द्वेष आणि हिंसाचार पसरवणे आहे. हे काम आरएसएसने त्यांच्यावर सोपवले आहे.**

शनिवारी राहुल शाजापूर जिल्ह्यातील कालापिपल विधानसभा मतदारसंघातील पोलईकलनमध्ये काँग्रेसच्या जनआक्रोश यात्रेत सामील झाले. ते बैठकीत म्हणाले, 'भारत 90 अधिकारी (कॅबिनेट सचिव आणि भारत सरकारचे सचिव) चालवतात. पैसा कुठे जाणार हे ते ठरवतात पण यातील फक्त तीन अधिकारी ओबीसी आहेत. संपूर्ण भारताच्या अर्थसंकल्पात ओबीसी अधिकाऱ्यांचा केवळ 5% सहभाग आहे. तर, भारतातील ओबीसी लोकसंख्या 50% आहे. काँग्रेस खासदार पुढे म्हणाले, 'देशासमोर एकच मुद्दा आहे - जात जनगणना. किती ओबीसी आहेत? त्यांचा सहभाग काय असावा? जेव्हा मी जातीच्या जनगणनेचा प्रश्न उपस्थित करतो तेव्हा भाजपचे लोक थरथर कापायला लागतात. नरेंद्र मोदी पळू लागले. अमित शहा हिंदू-मुस्लिम करणार. काँग्रेसचे सरकार आल्यावर आम्ही हे पहिले काम करू. राहुल म्हणाले, 'आमची भारत जोडो यात्रा मध्य प्रदेशात 370 किलोमीटरची होती. लोकांनी



मला सांगितले की मध्य प्रदेश हे भारतातील भ्रष्टाचाराचे केंद्र आहे. महाकाल कॉरिडॉरमध्ये भाजपने पैसे चोरले. आम्ही मध्यप्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, कर्नाटकातील शेतकऱ्यांना कर्जमाफीची आश्वासने दिली. इकडे कमलनाथ कर्जमाफी मिळवत होते पण फसवणूक करून भाजपवाल्यांनी सरकारला लुटले. व्यापम, मध्यान्ह भोजनाचाही त्यांनी उल्लेख केला. हा आपल्या विचारधारेतील संघर्ष आहे. एका बाजूला काँग्रेस, तर दुसऱ्या बाजूला आरएसएस आणि भाजप. एका बाजूला गांधीजी, तर दुसऱ्या बाजूला गोडसे. एका बाजूला द्वेष, हिंसा, अहंकार आणि दुसऱ्या बाजूला प्रेम, आदर आणि बंधुता आहे. ते जिथे जातात तिथे द्वेष पसरवतात आणि संताप निर्माण करतात. सरकार जनतेसाठी चालवले पाहिजे. कोणत्याही संस्थेसाठी आणि एक-दोन मोठ्या उद्योगपतींसाठी नाही. आज रेल्वे स्टेशन, विमानतळ, पायाभूत सुविधा सर्वत्र अदानी दिसतील. ते दररोज शेतकरी आणि जनतेच्या खिशातून पैसे घेत आहेत. मीडियाचा रिमोटही अदानींच्या हातात आहे. महिला आरक्षण लागू होण्यासाठी दहा वर्षे लागतील. याआधी सर्वेक्षण करण्याची गरज काय? महिला आरक्षणात ओबीसी आरक्षण का नाही, तर नरेंद्र मोदी हे ओबीसींचे नेते असल्याचे सांगतात. कायदे आरएसएस आणि भाजपचे लोक बनवतात. याबाबत भाजपच्या खासदारांनाही विचारले जात नाही. मध्य प्रदेशात भाजपच्या जनआशीर्वाद यात्रेला प्रतिसाद म्हणून काँग्रेसने 26 सप्टेंबरपासून जन आक्रोश यात्रा सुरू केली होती. काँग्रेसचे म्हणणे आहे की जन आक्रोश यात्रेच्या माध्यमातून पक्षाने भाजप सरकारच्या उणिवा आणि कमलनाथ यांच्या 1.25 वर्षांच्या सरकारचे काम आणि त्यांची 11 आश्वासने जनतेसमोर ठेवली आहेत.

### 50 टक्के कमिशनची व्यवस्था केली

» मध्य प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आणि माजी मुख्यमंत्री कमलनाथ म्हणाले, 'त्यांनी (भाजप) रेट कार्डचा प्रवास काढावा. प्रत्येक गोष्टीत 50 टक्के कमिशनची तरतूद करण्यात आली आहे. पंचायत ते मंत्रालयापर्यंत भ्रष्टाचार आहे. भाजपची वेळ आली आहे. राहुल गांधींचे नाव घेत ते म्हणाले, 'संपूर्ण राज्याचा तुमच्यावर विश्वास आहे. तुम्ही ज्या राज्यात आलात ते राज्य भ्रष्टाचार आणि बेरोजगारीत नंबर-1 आहे. शिवराज सिंह यांनी 18 वर्षे राज्याला देशोधडीला लावले आहे. घोषणा आणि खोटे बोलण्याचे त्यांचे यंत्र दुप्पट वेगाने धावत आहे.

# 2000 च्या नोटा बदलण्याच्या कालावधीत वाढ!

## » 7 ऑक्टोबरपर्यंत बदलता येणार 2000 च्या नोटा

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया म्हणजेच RBI ने बँकेत 2000 रुपयांच्या नोटा जमा करण्याची किंवा इतर नोटांसोबत बदलण्याची तारीख 7 ऑक्टोबरपर्यंत वाढवली आहे. आरबीआयने सांगितले की, 'पैसे काढण्याच्या प्रक्रियेचा निर्धारित कालावधी संपला आहे. पुनरावलोकनाच्या आधारावर, 2000 रुपयांच्या नोटा जमा करण्याची आणि बदलण्याची विद्यमान प्रणाली 7 ऑक्टोबर 2023 पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**



### सरकारची चूक सुधारली...

» 2016 मध्ये बंद करण्यात आलेल्या ₹500 आणि ₹1000 च्या नोटांची कमतरता पूर्ण करण्यासाठी ₹2000 च्या नोटा छापण्यात आल्या होत्या. जेव्हा इतर मूल्यांच्या नोटा पुरेशा प्रमाणात उपलब्ध झाल्या, तेव्हा 2000 रुपयांच्या नोटांची छपाई 2018-19 मध्ये बंद करण्यात आली. म्हणजेच 2000 रुपयांच्या नोटा चलनातून बाद करणे ही सरकारची चूक सुधारली आहे असे थेट म्हणता येणार नाही.

यापूर्वी, आरबीआयने या वर्षी 19 मे रोजी एक परिपत्रक जारी करून 30 सप्टेंबरपर्यंत 2000 रुपयांच्या नोटा बँकांमध्ये जमा करण्यास किंवा बदलण्यास सांगितले होते. यानंतरही 2000 रुपयांची नोट कायदेशीर राहील, असे त्यावेळी सांगण्यात आले होते. आरबीआयच्या म्हणण्यानुसार, 31 ऑगस्ट 2023 पर्यंत 3 हजार 56 अब्ज रुपयांच्या नोटा बँकांमध्ये परत आल्या आहेत. 2000 रुपयांची नोट नोव्हेंबर 2016 मध्ये बाजारात आली होती. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 500 आणि 1000 रुपयांच्या नोटा चलनातून बाद करण्याची घोषणा केली होती. त्यांच्या जागी नव्या पॅटर्नमध्ये 500 आणि 2000 रुपयांच्या नव्या नोटा जारी करण्यात आल्या. मात्र, 2018-19 पासून RBI ने 2000 रुपयांच्या नोटांची छपाई थांबवली आहे. तर 2021-22 मध्ये 38 कोटी 2000 रुपयांच्या नोटा नष्ट झाल्या. नाही, बँकेत जाऊन कोणत्याही कागदपत्राशिवाय या नोटा सहज बदलता येतील. नोटा बदलून घेताना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी बँकांनाही याबाबत माहिती देण्यात आली आहे. सरकारने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार, बँकेत नोटा बदलून घेण्यासाठी कोणत्याही प्रकारची कागदपत्रे द्यावी लागणार नाहीत. एका वेळी 20,000 च्या मर्यादेपर्यंत, 2000 च्या नोटा बदलल्या जाऊ शकतात म्हणजेच इतर मूल्यांमध्ये बदलल्या जाऊ शकतात. तुमचे खाते असल्यास तुम्ही खात्यात कितीही 2000 रुपयांच्या नोटा जमा करू शकता. ज्याच्याकडे 2000 रुपयांची नोट असेल त्याला बँकेत जाऊन बदलून घ्यावे लागेल. 2016 च्या नोटाबंदीमध्ये, जेव्हा 500 आणि 1000 रुपयांच्या नोटांवर बंदी घालण्यात आली तेव्हा त्या बदलण्यासाठी लांबच लांब रांगा लागल्या होत्या. त्यामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले. यंदाही तशी परिस्थिती निर्माण झालेली नाही.

# महिन्याच्या पहिल्याच दिवशी महागाईचा झटका, व्यावसायिक सिलिंडरच्या दरात २०९ रुपयांची वाढ

। मुंबई । वृत्तसंस्था : महाईन्यूज



मुंबई, दिल्ली, चेन्नई आणि कोलकातामध्ये व्यावसायिक वापराच्या गॅस सिलेंडरच्या दरात मोठी वाढ झाली आहे. याची झळ व्यावसायिकांना आणि पर्यायाने सामान्यांना बसेल. ऑक्टोबर महिन्याच्या पहिलाच दिवस महागाईचा झटक्याने उजाडला आहे. तेल कंपन्यांकडून LPG सिलिंडरचे नवे दर जाहीर केले आहेत. त्यानुसार १ ऑक्टोबरपासून व्यावसायिक वापराच्या एलपीजीच्या दरात मोठी वाढ झाली आहे. १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी सिलिंडरसाठी आता तब्बल २०९ रुपये जादा मोजावे लागतील. या दरवाढीमुळे आता देशाची राजधानी असलेल्या दिल्लीत व्यावसायिक सिलिंडरचा दर १७३१.५० रुपयांवर पोहोचला आहे. तर आता मुंबईत व्यावसायिक सिलिंडरसाठी १६८४ रुपये मोजावे लागणार आहेत. यापूर्वी ऑगस्ट महिन्यात व्यावसायिक एलपीजीचा दर १०० रुपयांनी घटला होता. मात्र, या तात्पुरत्या दिलासानंतर आता तेल कंपन्यांनी सिलिंडरच्या दरात थेट २०९ रुपयांची सामान्य व्यावसायिकांना मोठा झटका दिला आहे.

व्यावसायिक सिलिंडरची किंमत वाढली असली तरी घरगुती एलपीजीच्या दरात कोणताही वाढ करण्यात आलेली नाही. यापूर्वी ३० ऑगस्ट रोजी घरगुती सिलिंडरचे दर २०० रुपयांनी कमी झाले होते. व्यावसायिक सिलिंडरच्या दरात झालेली वाढ ही प्रत्येक शहरात वेगवेगळी आहे. दिल्लीत व्यावसायिक एलपीजीचा दर २०९ रुपयांनी, कोलकातामध्ये २०३ रुपये आणि मुंबईत व्यावसायिक सिलिंडरसाठी २०२ रुपये जास्त मोजावे लागणार आहेत.



# अर्चना पुरणसिंह अन् बिग बी अफेअर ?



बॉलिवूडचे महानायक अमिताभ बच्चन हे नेहमीच कोणत्या ना कोणत्या कारणाने चर्चेत असतात. कधी त्यांच्या आगामी चित्रपटांमुळे तर कधी त्याच्या शो मुळे. मात्र यासोबत बिग बी त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे देखील तितकेच चर्चेत असतात. अमिताभ बच्चन आणि रेखा यांचे अफेअर हे चित्रपटसृष्टीतील सर्वाधिक चर्चेत असलेले अफेअर होते. मात्र एक काळ असा होता की बिग बी हे रेखासोबतच्या नात्यामुळे नव्हे तर अर्चना पूरन सिंगसोबतच्या अफेयरच्या बातम्यांमुळे चर्चेत आले होते. अमिताभ बच्चन यांचे अर्चना पूरन सिंगसोबत खरोखर अफेअर होते का? असा प्रश्न आजही अनेकांना पडतो. वास्तविक, 1992 मध्ये एका फिल्म मॅगझिनच्या कव्हर पेजवर एक फोटो प्रसिद्ध झाला होता. ज्याने सर्वत्र खळबळ उडाली. हा फोटो होता अमिताभ बच्चन आणि अर्चना पूरण सिंह यांचा.मात्र अमिताभ बच्चन हे अर्चनाला डेट करत असल्याची बातमी लोकांना काय खरी पटेना. मात्र त्या फोटोमुळे अमिताभ बच्चन यांच्या चाहत्यांना तसेच मित्रांनाही मोठा धक्का बसला होता. मात्र या फोटोमागे काही वेगळीच स्टोरी होती. खर तर या फोटोत अमिताभ बच्चन नसून त्यांच्यासारखा दिसणारा विजय सक्सेना नावाचा व्यक्ती होता. त्या मॅगझिनने आपल्या वाचकांना एप्रिल फूल बनविले होते. मात्र जेव्हा अमिताभ आणि अर्चनाच्या अफेयरची बातमी पसरली तेव्हा मात्र बिग बी हे काहीच बोलले नाही. त्यांना याबद्दल कल्पना होती. मात्र अमिताभ यांना सांगण्यात आले की मासिकात या बातमीच्या खाली हा फक्त एक प्रँक आहे जो एप्रिल फूलच्या दिवशी करण्यात आला आहे

## घाबरुन स्वत:ला खोलीत बंद करायचो -रणदीप हुडा

रणदीप हुडा हा बॉलीवुडमधला दमदार अभिनेता आहे. रणदीपने आजवर अनेक सिनेमांमधुन स्वतःचं स्थान कमावलं आहे. रणदीप खऱ्या अर्थाने प्रत्येक भुमिकेसाठी मेहनत घेत असतो. तो सध्या त्याच्या 'स्वतंत्र वीर सावरकर' या चित्रपटाच्या तयारीत व्यस्त आहे. या चित्रपटासाठीही त्याने खुप मेहनत घेतली आहे. या चित्रपटासाठी त्याने तब्बल 25 किलो वजन कमी केले. मात्र आता त्याने त्याच्या जुन्या चित्रपटाच्या वाईट अनुभवाबद्दल सांगितले आहे. 'बॅटल ऑफ सारागढी' या चित्रपटाबाबत तो बोलत होता. या चित्रपटानंतर रणदीपची वाईट अवस्था झाली आणि तो डिप्रेशन गेल्याचं त्याने सांगितलं. मॅशेबल इंडियाला दिलेल्या मुलाखतीदरम्यान रणदीपने त्याचा 'बॅटल ऑफ सारागढी' रिलीज न झाल्याबद्दल भाष्य केले आहे. चित्रपट प्रदर्शित न झाल्यामुळे तो खुप दु:खी झाला होता. त्याची फसवणूक झाल्याचे त्याने सांगितले. तो या चित्रपटात ईशर सिंगची भुमिका करत होता. यासाठी त्याने तीन वर्षे मेहनत घेतली होती. त्याने खुलासा केला की प्रेक्षकांना हा चित्रपट पाहण्याची संधी मिळाली नाही. यासाठी त्याने 3 वर्षे मेहनत घेतली यासाठी त्याने केस आणि दाढी वाढवली होती, त्या भूमिकेसाठी रणदीपने अनेक चित्रपट नाकारले होते. त्यानंतर अक्षय कुमारने 2018 मध्ये आलेल्या 'केसरी' चित्रपटाची घोषणा केली त्याच वर्षी केसरी सिनेमा प्रदर्शित झाला. यामुळे रणदीपनं तीन वर्षे घेतलेली मेहनत वाया गेली आणि याचा परिणाम म्हणजे तो

## अश्विनीनं सांगितली लाकूडतोड्याची गोष्ट!



मराठी मनोरंजन विश्वातील लोकप्रिय अभिनेत्री अश्विनी महांगडे ही नेहमी चर्चेत असते. स्टार प्रवाह वाहिनीवरील 'आई कुठे काय करते' या मालिकेत अनघाची भुमिका साकारुन ती घराघरात पोहचली आहे. अश्विनी केवळ मालिकाचं नाही तर नाटक आणि चित्रपटांच्या माध्यमातुनही प्रेक्षकांचे मनोरंजन करत असते. ती काही दिवसांपुर्वी महाराष्ट्र शाहीर या चित्रपटात दिसली होती. आता ती तिचा नवा चित्रपट "पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर" साठी चर्चेत आहे. अश्विनी महांगडे ती सोशल मीडियावरही कमालीची सक्रिय असते. ती तिचे फोटो आणि नवनवीन पोस्ट चाहत्यांसोबत शेयर करत असते. आता अश्विनीनं नुकतच तिचं एका साडीतील फोटोशूट इंस्टाग्रामवर शेयर केलं आहे. हे फोटोशुट तिने एका लाकडाच्या वखारीत केलं आहे. हे फोटो पोस्ट करत तिने तिच्या आयुष्यातल्या खऱ्या लाकूडतोड्याची गोष्ट सांगितलं आहे. तो लाकूडतोड्या म्हणजे अश्विनीचे वडील. या पोस्टमध्ये ती लिहिते की, काही फोटोशूट हे अर्थपूर्ण असतात. हे फोटोशूट मी माझ्या घरी केले. आता सगळ्यांना प्रश्न पडला असेल की मागे लाकूड आहे, जळण पडलंय, कसली तरी मशीन आहे आणि हे कसले घर? नाना (माझे वडील) यांनी सुरुवातीच्या काळात कामधंदा सुरू करताना अनेक वेगवेगळ्या ठिकाणी काम करण्याचा प्रयत्न केला पण जम बसला नाही तरीही प्रयत्न मात्र थांबले नाहीत. त्यावेळी कुणाच्या तरी शेतातील सुकलेले झाड, शेतात बांधावर असलेले बाभळीचे झाड ते विकत घेवु लागले आणि सुरू झाला माझ्या बापमाणसाचा लाकूडतोड्या हा व्यवसाय. अतिशय कष्टाचा हा व्यवसाय. तेव्हा गॅस नव्हते त्यामुळे चुलीसाठी जळण, घर बांधण्यासाठी फळ्या, आणि मयतीसाठी जळण असा त्याचा वापर व्हायचा. या कामात त्यांची साथ माझ्या मम्मीने तर दिलीच पण त्याहीपेक्षा जास्त साथ ही त्यांच्या आईने लक्ष्मीबाई हिने दिली. रोज वखारित जावून बसायला लागायचे. ते काम आज्जी करायची. १-१ पैशाचा हिशोब रात्री ती नानांना सांगायची. नाना खूप अभिमानाने सांगायचे की मी लाकूडतोड्या आहे आणि मला आपली लोखंडाची कुऱ्हाडच प्रिय. एक उत्तम कलाकार असूनही केवळ आपल्या कुटुंबासाठी,पोटापाण्यासाठी वेगळे क्षेत्र निवडून त्यावर प्रेम केले आणि त्याचा आम्हालाही आदर आहे.

## अनुष्का - विराटच्या घरी गुडन्यूज ?

बॉलिवूड अभिनेत्री अनुष्का शर्मा आणि विराट कोहली हे बी-टाऊनचे लोकप्रिय कपल आहे. आता अनुष्का शर्मा आणि विराट कोहलीबाबत एक मोठी गोड बातमी सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. अनुष्का शर्मा आणि विराट कोहली लवकरच चाहत्यांना गोड बातमी देणार आहे. अनुष्का आणि विराट लवकरच त्यांच्या दुसऱ्या मुलाचे स्वागत करणार आहेत. अनुष्का शर्मा आणि विराट कोहली दुसऱ्यांदा पालक होणार आहेत. अनुष्का तिची दुसरी प्रेग्नेंसी एन्जॉय करत आहे. अनुष्का शर्मा सध्या तीन महिन्याची प्रेग्नंट असल्याचं बोललं जात आहे. अनुष्का बऱ्याच दिवसांपासून कोणत्याही कार्यक्रमात दिसली नाही. ती सार्वजनिक कार्यक्रमांपासून लांब आहे. काही काळापूर्वी ती पती विराट कोहलीसोबत मुंबईतील एका क्लिनिकमध्ये दिसली होती. त्यावेळी अनुष्का आणि विराटने पापाराझींना फोटो आणि व्हिडिओ पोस्ट न करण्याची विनंती केली होती. त्याचबरोबर अनुष्का शर्मा गेल्या काही दिवसांपासून मीडियाच्या लाइमलाइटपासूनही दूर असल्याने या अफवा पसरल्या आहेत. ही बातमी खरी असल्याच अनुष्का आणि विराट लवकरच चाहत्यांसोबत ही गोड बातमी शेयर करतील अशी अपेक्षा दोघांचे चाहते करत आहे.



## ऐश्वर्याच्या खांद्यावर हात ठेवणाऱ्या आराध्याने लक्ष वेधलं

ऐश्वर्या आणि आराध्या बच्चन या मायलेकी चांगल्याच चर्चेत असतात. अनेकदा इव्हेंट, पार्टीला या दोघी एकत्र दिसतात. ऐश्वर्या कायमच लेक आराध्याला सांभाळताना आणि सपोर्ट करताना दिसते. या मायलेकी पुन्हा एकदा चर्चेत आल्यात. ते म्हणजे प्रतिष्ठित अशा पॅरिस फॅशन शोमध्ये या दोघी सहभागी होणार आहेत. यासाठी त्यांनी खास मेकओव्हर केलेला दिसतोय. पॅरिस फॅशन वीकमध्ये सहभागी होण्यासाठी ऐश्वर्या राय बच्चन आणि तिची मुलगी आराध्या बच्चन आज मुंबईहून विमानाने निघाल्या. वृत्तानुसार, 3 ऑक्टोबर रोजी होणाऱ्या फॅशन वीकचा भाग होण्यासाठी ऐश्वर्या मुलीसह पॅरिसमध्ये असेल. पापाराझींनी ऐश्वर्या आणि आराध्याला मुंबई विमानतळाबाहेर क्लिक केले. आई-मुलीची जोडी एकदम स्टाईलिश आणि आरामदायक लूकमध्ये दिसल्या. पापाराझींनी ऐश्वर्या राय बच्चन आणि आराध्या बच्चन यांना त्यांच्या कारमधून उतरताना विमानतळाबाहेर स्पॉट केले. आई-मुलीच्या जोडीने एकमेकांचे हात धरले होते आणि कॅमेराकडे हसत त्यांनी फोटो क्लिक केले. ऐश्वर्याने संपूर्ण काळ्या पोशाखात अगदी सुंदर दिसत होती. तर आराध्या निळ्या रंगाच्या टीशर्टमध्ये आईच्या खांद्यावर हात ठेऊन चालत होती. वर्कफ्रंट बद्दल बोलायचं झालं तर ऐश्वर्या या वर्षी पोनियन सेल्व्हन 2 (PS 2) सिनेमात दिसली. या सिनेमाने बॉक्स ऑफीसवर चांगली कामगिरी केली. चोळ साम्राज्यावर आधारीत हा भव्य दिव्य सिनेमा मणीरत्नम यांनी दिग्दर्शित केला.

# टीम इंडियापुढे पाकिस्तानने टेकले गुडघे!

## एकतर्फी सामन्यात 10-2ने भारताचा ऐतिहासिक विजय

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**हांगझाऊ आशियाई क्रीडा स्पर्धेत पुरुष हॉकीमध्ये भारताने पाकिस्तानचा १०-२ असा पराभव केला आहे. हरमनप्रीत सिंगच्या नेतृत्वाखाली टीम इंडियाने सलग चौथा विजय मिळवला. यासह भारत उपांत्य फेरीसाठी पात्र ठरला आहे. आता अ गटातील अंतिम सामन्यात भारत बांगलादेशशी भिडणार आहे. टीम इंडियासाठी कर्णधार हरमनप्रीत सिंगने चार, तर वरुणने दोन गोल केले. ललित, समशेर, मनदीप आणि सुमित यांनी प्रत्येकी एक गोल केला. भारत-पाकिस्तान हॉकी सामन्यात कोणत्याही संघाने १० गोल करण्याची ही पहिलीच वेळ आहे. भारताने हा नवीन विक्रम करत इतिहास नोंदवला आहे.**



पहिल्या क्वार्टरमध्ये आठव्या मिनिटालाच भारताने पहिला गोल केला. मनदीप सिंगने मैदानी गोल करत टीम इंडियाला १-० अशी आघाडी मिळवून दिली. यानंतर ११व्या मिनिटाला पाकिस्तानी गोलकीपरच्या फाऊलमुळे भारताला पेनल्टी स्ट्रोक मिळाला. यावर कर्णधार हरमनप्रीत सिंगने गोल करत भारतीय संघाला २-० ने आघाडीवर नेले. भारतीय संघाने पहिल्या क्वार्टरमध्ये २-० अशी आघाडी घेतली होती. दुसऱ्या क्वार्टरच्या १७व्या मिनिटाला भारतीय कर्णधार हरमनप्रीत सिंगने पेनल्टी कॉर्नरवर ड्रॅग फ्लिकसह अप्रतिम गोल केला आणि टीम इंडियाची आघाडी ३-० अशी वाढवली. यानंतर ३०व्या मिनिटाला म्हणजेच दुसऱ्या क्वार्टरच्या शेवटच्या क्षणी सुमित, ललित आणि गुरजंत यांच्या जोडीने भारताने चौथा गोल केला. मध्यंतरापर्यंत भारताने पाकिस्तानवर ४-० अशी आघाडी घेतली होती. तिसऱ्या क्वार्टरच्या ३३व्या मिनिटाला पाकिस्तानने केलेल्या फाऊलवर भारताला आणखी एक पेनल्टी स्ट्रोक मिळाला. यावर कर्णधार हरमनप्रीतने गोलची हॅट्रिक पूर्ण केली. यानंतर ३४व्या मिनिटाला हरमनप्रीतने पेनल्टी कॉर्नरवर ड्रॅग फ्लिकसह चौकार लगावला. ३८व्या मिनिटाला पाकिस्तानच्या सुफियान मोहम्मदने पेनल्टी कॉर्नरवर ड्रॅग फ्लिकसह अप्रतिम गोल केला. या सामन्यातील पाकिस्तानचा हा पहिला गोल ठरला. यानंतर ४१व्या मिनिटाला सुखजीतच्या पासवर भारताच्या वरुण कुमारने शानदार गोल करत भारताची आघाडी ७-१ अशी वाढवली. यानंतर तिसऱ्या क्वार्टरच्या शेवटच्या क्षणी पाकिस्तानच्या अब्दुलने पेनल्टी कॉर्नरवर गोल करत पाकिस्तानला विजय मिळवून दिला. तिसऱ्या क्वार्टरमध्ये भारताने पाकिस्तानवर ७-२ अशी आघाडी घेतली होती. चौथ्या क्वार्टरच्या ४६व्या मिनिटाला भारताच्या समशेरने अप्रतिम मैदानी गोल केला. या सामन्यातील भारताचा हा आठवा गोल ठरला. यानंतर ४९व्या मिनिटाला जर्मनप्रीत सिंगकडून ललित उपाध्यायने गोल करून भारताची आघाडी ९-२ अशी वाढवली. ५३व्या मिनिटाला वरुणने सामन्यातील आपला दुसरा आणि भारताचा १०वा गोल केला. अशा प्रकारे टीम इंडियाने पाकिस्तानचा १०-२ असा पराभव केला. एशियाडमध्ये भारताची कामगिरी उत्कृष्ट राहिली असून, पूल-अ मध्ये आतापर्यंत चारही सामने जिंकले आहेत. त्याचवेळी, पाकिस्तान संघाने भारताविरुद्धच्या सामन्यापूर्वी अ गटातील तिन्ही सामने जिंकले होते. भारतीय संघ जबरदस्त फॉर्मात आहे. त्यांनी त्यांच्या पूल-ए सामन्यात उझबेकिस्तानचा १६-० असा पराभव केला होता. यानंतर हरमनप्रीत सिंगच्या नेतृत्वाखालील संघाने सिंगापूरचा १६-१ असा पराभव करत सलग दुसरा विजय संपादन केला. त्यानंतर टीम इंडियाने २०१८ आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक विजेत्या जपानचा ४-२ असा पराभव करून विजयाची हॅट्रिक साधली. आता भारताने पाकिस्तानला हरवून विजय संपादन केला आहे. त्याचवेळी, पूल ए च्या पहिल्या सामन्यात पाकिस्तानने सिंगापूरचा ११-०, बांगलादेशचा ५-२ आणि उझबेकिस्तानचा १८-२ असा पराभव केला होता. भारताविरुद्ध १०-२ असा पराभव पत्करावा लागला.

### भारत-पाकिस्तान आमनेसामने विक्रम

» या एशियाड सामन्यापूर्वी, भारत आणि पाकिस्तान यांच्यातील शेवटचा सामना यावर्षी ऑगस्टमध्ये आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीच्या पूल सामन्यादरम्यान झाला होता. भारतीय संघाने हा सामना ४-० असा जिंकला होता. २०१३ पासून भारत आणि पाकिस्तान यांच्यात २५ सामने खेळले गेले आहेत. टीम इंडियाने या कालावधीत १७ सामने जिंकले आहेत, तर पाकिस्तानने पाच सामने जिंकले आहेत. तीन सामने अनिर्णित राहिले. दोन्ही देशांदरम्यान एकूण १८० सामने खेळले गेले आहेत. यापैकी टीम इंडियाने ६६ सामने जिंकले आहेत, तर पाकिस्तानने ८२ सामने जिंकले आहेत. ३२ सामने अनिर्णित राहिले.

# मोदी स्टेडियमच्या सुरक्षेबाबत एजन्सी सतर्क!

## गुजरात पोलिसांनी केंद्रीय यंत्रणांकडे मदत मागितली

पिंपरी । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतात 5 ऑक्टोबरपासून क्रिकेट वर्ल्ड कपला सुरुवात होत आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमपासून सामना सुरू होणार आहे. दरम्यान, खलिस्तानवाद्यांनी सामन्यात अडचणी निर्माण करण्याच्या धमक्यांमुळे गुजरात पोलिसांनी केंद्रीय यंत्रणांकडे मदत मागितली आहे.**

अहमदाबाद सायबर क्राइमचे डीसीपी अजित राजियन यांनी दैनिक भास्करला सांगितले की, सुरक्षेच्या दृष्टीने आम्ही केंद्रीय यंत्रणांची मदत घेतली आहे. आता देशातील सर्वोच्च एजन्सी अहमदाबाद सायबर क्राईमसोबत या प्रकरणी काम करणार आहे. यामध्ये एनआयए, आरओ, सेंट्रल आयबी यांचाही समावेश असेल. अधिकृतरीत्या आम्ही कामालाही सुरुवात केली आहे. डीसीपी अजित राजियन पुढे म्हणाले की, येत्या काही दिवसांत भारतात क्रिकेट विश्वचषक सुरू होणार आहे, या विश्वचषकावर खलिस्तानी समर्थकाने रेकॉर्ड केलेला कॉल करून भीती पसरवण्याचा प्रयत्न केला आहे. हे सर्व कॉल्स परदेशी भूमीवरून करण्यात आले होते. सुरक्षा यंत्रणांनीही सुरक्षेसाठी तयारी केली आहे.



उल्लेखनीय आहे की अहमदाबाद सायबर सेलमध्ये खलिस्तानी दहशतवादी गुरपतवंत पन्नूविरोधात एफआयआर दाखल करण्यात आला आहे. अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर भारत आणि पाकिस्तान यांच्यात होणाऱ्या विश्वचषक क्रिकेट सामन्यावर हल्ला करण्याची धमकी पन्नूने दिली आहे. शहीद निज्जर यांच्या हत्येसाठी पंतप्रधान मोदी जबाबदार असून शिख फॉर जस्टिस या हत्येचा बदला घेणार असल्याचे दहशतवादी पन्नूने प्री रेकॉर्डेड मेसेज व्हिडिओमध्ये म्हटले आहे. 5 ऑक्टोबर रोजी अहमदाबाद येथे होणाऱ्या विश्वचषकाचे सामने आमचे लक्ष्य असतील. धमकीच्या संदेशात पन्नूने भारत-पाकिस्तान सामन्याला लक्ष्य करून अहमदाबाद स्टेडियमवर खलिस्तानी ध्वज फडकावण्याबाबत बोलले आहे. या ऑडिओचा खुलासा पन्नूने केला असल्याचा दावा केला जात आहे. याआधीही पन्नूने 15 ऑगस्टला आणि जी-20 शिखर परिषदेत गोंधळ घालण्याची धमकी दिली होती. याप्रकरणी दिल्ली पोलिसांनी काही लोकांना अटकही केली होती.

### वेगवेगळ्या लोकांना पाठवल्या क्लिप

» एका अनोळखी मोबाईल नंबरवरून धमक्या असलेली ऑडिओ क्लिप वेगवेगळ्या लोकांना पाठवण्यात आली होती. या ऑडिओ क्लिपच्या शेवटी धमकी देणाऱ्या व्यक्तीने स्वतःची ओळख गुरपतवंत सिंग पन्नू अशी दिली आहे. गुरपतवंत सिंग पन्नू हा भारत राही खलिस्तान चळवळीच्या नावाने 'सिख फॉर जस्टिस' (SFJ) नावाची संघटना चालवणारा मुख्य सूत्रधार आहे. ज्याला भारत सरकारने दहशतवादी घोषित केले आहे.